# साहित्य समीक्षा

## साहित्यिक समिक्षा

## ( Review of Literature )

स्वभाव म्हणजे निसर्ग. स्वभावसंसिध्द म्हणजे निसर्गतःच उत्पन्न झालेला(1)

चरक सुश्रुत आणि काश्यप संहितेत वर्णित केलेल्या ह्या सूत्रातून असा बोध होतो की प्रथम आयुर्वेद शास्त्राची उत्पत्ति झाली. आणि त्यानंतर मानवादी जन्माला आले. प्रचलीत काळात हे अशक्य आणि हास्यास्पद वाटते पण शब्दार्थ सोडून जर त्या सूत्रांच्या वाक्यार्थांचा विचार केला तर त्याचे सार्थक्य सिध्द होते.(2-3)

मनुष्यादि प्राणि कसा जन्माला यावा, त्याची वाढ, शारीरिक क्रिया-प्रक्रिया कशा सुरळित व्हाव्यात यासंबंधी सर्व नैसर्गिक नियम प्रजा निर्माण करणा-या निसर्ग देवतेने म्हणजेच ब्रम्हाने निर्माण केले आहे. मनुष्य जन्माला आल्यानंतर त्याला केंव्हा न केंव्हा रोगोत्पत्ति होणारच आणि रोगोत्पत्ति झाल्यानंतर त्यावर काही उपचार त्याला करावेच लागणार. रोगाच्या प्रारंभा पासूनच वैद्यक शास्त्रात निसर्ग स्वरुपात का होईना सुरुवात होते. म्हणून, 'निसर्ग' हा वैद्यांचा वैद्य आहे असे म्हटले आहे. कारण शरीर हे निसर्ग नियमानुसारच स्वतःच स्वतःला बरे करीत असते. औषधें किंवा चिकित्सक त्याला साहय करीत असतात.

प्रथम सुरुवातीला मानव समाज निसर्गावस्थेत होता. त्याचे विचार आणि वागणे हे सर्वस्वी निसर्गापासून मिळणा-या अंतःसंवेदनावर अवलंबून असे. मानवी शरीर जास्तीत जास्त काळ पर्यंत सुस्थितीत, व्याधिमुक्त राहावे म्हणून सदैव प्रयत्नशील असते. आणि त्यामुळे

---

(1)सो यमायुर्वेदः शश्वतो निर्दिश्चते अनादित्वात
स्वभावसंसिध्दलक्षणत्वात् स्वाभावभाव नित्यत्वाच्छ । (च.सू.30-27)

(2)अनुत्पाद्यैव प्रजा आयुर्वेदमेवाग्रे सृजत् । (सु.यु.3-1)

(3)आयुर्वेदमेवाग्रे सृजततो विश्वानि भूतानि । (काश्यप.सं.)

प्रत्येक व्यक्तिला आरोग्यकारक अशा आंतरिक संवेदना होत असतात. ह्याच निसर्ग संवेदन तत्वाला प्राधान्य देऊन 'निसर्गोपचार' हे वैद्यकशास्त्र निर्माण झाले आहे. ह्यामधे व्याधिउत्पादक कारणांविषयी द्वेष निर्माण होतो. त्याचप्रमाणे निसर्गच व्यक्तिला आहार, विहार उपचार सुचवित असतो. मनुष्येतर प्राण्यांना भाषाज्ञान नसल्या कारणामुळे ते आपले अनुभव इतरांना सांगु शकत नाही त्यांना आपआपल्या नैसर्गिक संवेदनावरच अवलंबून राहावे लागते. पण मनुष्य इतर प्राण्यापेक्षा बुध्दिमान असल्या कारणाने तो आपले अनुभव इतरांना सांगू लागला. असे एकमेकांचे अनुभव एकत्रित होऊ लागले, अशाप्रकारे अनेक पिढयांचे अनुभव एकत्र येवून त्यांचे समाजातील वृध्द व्यक्तिकडे संकलन होऊ लागले. ज्यांना काही त्रास झाला असे लोक त्यांच्याकडे जाऊन उपचार करुन घेवु लागले. आणि ह्यप्रमाणे (आदिमानववैद्यक किंवा निसर्गवैद्यक) वैद्यकशास्त्राच्या निर्मितीची सुरुवात झाली.

ह्या प्रथमावस्थेतील मानव भावनाप्रधान, अर्तक्य आणि चमत्कारिक गोष्टींवर विश्वास ठेवणारा होता. नैसर्गिक चमत्काराला तो देवता समजू लागला. आणि जे काही बरेवाईट घडले ते दैवी' प्रकोपामुळे घडले असे समजू लागला. व्याधि का उत्पन्न होतात हे त्याला समजत नसे आणि त्यामुळे तो दैवी प्रकोप आहे असे समजू लागला. ह्याच कल्पनेने देवतांना प्रसन्न करण्यासाठी मंत्र, तंत्र, बली, होम-हवन आदि करु लागला म्हणून प्रारंभिक वैद्यक शास्त्रात चिकित्से सोबत मंत्र-तंत्र चिकित्सेला तेवढेच महत्व होते. याचा उल्लेख अथर्ववेदात आढळतो. प्राचिन ग्रंथांचे अवलोकन केल्यास आयुर्वेद हा ऋग्वेदापासून निर्माण झाला. काही विद्वानांच्या मते आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद आहे. चरक, सुश्रुत, काश्यपसंहितेत तो अथर्ववेदाचा उपवेद आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. ऋग्वेदात आरोग्य आणि औषधी याचा स्पष्ट उल्लेख मिळतो. ऋग्वेद काळात पाण्याला अमृत म्हटले आहे आणि ते एक प्रकारचे अमृत समजले जात असे. (ऋग्वेद 1,23,20, 137,6) वाजिकरणाचा उल्लेख देखील ऋग्वेदात आहे. सूर्याची स्तुती त्यात केली असून उदयपावलेला सूर्य कृमीचा नाश करतो तसेच गर्भाशयातील विविध व्याधि आणि कृमी नष्ट व्हावेत म्हणून मंत्रांचा उल्लेख मिळतो. (10,162,1,4) तसेच विविध प्रकारच्या कृमीचे आणि विषांचे वर्णन मिळते. आणि त्यांच्या प्रतिबंधनाचा उपाय देखिल वर्णन केलेला आहे. सूर्यप्रकाश, वायुच्या उल्लेखा बरोबरच शरीर अवयवांचा देखिल स्पष्ट उल्लेख आढळतो.

अथर्ववेदात ब-याच वनस्पति आणि व्याधिंचा उल्लेख मिळतो. गोपथब्राम्हणात ( 3, 1, 19 ) ऋतुसंधीत रोग निर्माण होतात असा उल्लेख आहे. आणि त्याच्या प्रतिबंधनासाठीयज्ञ करावा असा उल्लेख आहे. मनुस्मृतीमधे स्वस्थवृत्ताचा विशेष उल्लेख केला आहे. आणि त्याच प्रमाणे वेदात देखिल ब-याच ठिकाणी उल्लेख मिळतो. सद्वृत्ताचा उल्लेख ऋग्वेद काळापासून आहे. 'स्वस्थि पंथानम् अनुचरते' ( ऋग्वेद 5, 11, 7 ) 'सत्यम वद्त् कर्मन्' ( ऋग्वेद 9, 113, 4 ) आदि.

रामायण, महाभारत ह्यांची निर्मिति वेद कालानंतर झाली. रामायणात रामरावण युध्दात लक्ष्मण मुर्च्छित झाला तेंव्हा सुषेणवैद्याने त्याची चिकित्सा केली. त्याचप्रमाणे त्या काळात मृत व्यक्तिचे शरीर टिकविण्याकरिता तैलद्रोणी किंवा मध ह्याचा उल्लेख आढळतो. ( वा.रा. अयोध्याकांड 14, 16 ) ह्या वरुन असे सिध्द होते की, रामायण काळात देखिल अत्ययिक चिकित्सा आणि शल्यचिकित्सा होत असावी तसेच अनुमानाने असे सिध्द होते की, वैद्याला त्या काळी संक्रमण चिकित्सेची ही माहिती असावी म्हणजेच वैद्याला कृमींचे ज्ञान असावे.

महाभारत काळात सत्यवतीचा पुत्र विचित्रवीर्य ह्यास अति स्त्री सेवनामुळे 'राजयक्ष्मा' व्याधि झाला. राजभिकांनी त्याची चिकित्सा केली पण तो बरा झाला नही असा उल्लेख मिळतो. त्याच प्रमाणे कुष्ठरोग असाध्य होता असा देखिल उल्लेख मिळतो. पथ्यापथ्याचा विचार देखिल महाभारत काळात होता. तसेच आयुर्वेदाच्या आठ अंगांचा उल्लेख देखिल मिळतो. शल्यचिकित्सा त्याच प्रमाणे मानस रोगाची चिकित्सा त्या काळी केल्या जात होती हे देखिल स्पष्ट होते. तसेच पशुवैद्यक शास्त्र त्या काळी प्रगत असावे असा उल्लेख मिळतो. ( विराटपर्व अ.2 ) महाभारतकालीन भारतीय समाज अत्यंत उन्नत अवस्थेत होता. गीते सारख्या अत्युत्तम तत्व ज्ञानाचा ग्रंथ त्या काळी निर्माण झाला. आर्यांचा बौध्दिक स्तर बराच उंचावलेला होता त्यामुळे वैद्यक शास्त्र त्या काळी प्रगत अवस्थेत असावे.

अग्निपुराणात सिध्दौषधांनी सर्व रोग हरणारी औषधी, रसादी लक्षण, बालग्रहहर, बालतंत्र, आदि आयुर्वेदीय विषय आढळतात. गरुडपुराणात 146 ते 200 पर्यंतच्या अध्यायात आयुर्वेदीय स्वस्थ वृत्ताचा उल्लेख आढळतो. त्यात रोगांचे वर्णन, रसायन, वाजिकरण, नेत्र-रोग आदिंचे वर्णन मिळते.

मनुस्मृतीमध्ये सद्‌वृत्ताचार आयुर्वेदीय स्वस्थवृताशी अधिक जुळणारा आहे. त्याचप्रमाणे विष्णुस्मृतीतील स्वस्थवृत्तासंबंधी नियम आणि वाग्भटात आलेले नियम ह्यात बरेच साम्य आहे. ह्यप्रमाणे अर्वाचिन वेदग्रंथात आयुर्वेदीय स्वस्थवृत्ताचे वर्णन मिळते.

आहार, निद्रा ब्रम्हचर्य हे शरीरातील तीन उपस्तंभ सांगितले आहे.' आहार शास्त्रा विषयी विस्तृत आणि सूक्ष्म विचार आयुर्वेद शास्त्रात केलेला आहे. सर्वग्रह आणि परिग्रह ह्यांच्या माध्यमाद्वारा आहार मात्रेत संतुलीत आहाराचे स्वरुप ह्या व्यतिरीक्त प्रकृति, करण, संयोग, राशि, देश, काल, उपभोक्ता आणि उपयोग संस्था ह्यांचा देखिल विचार त्याच प्रमाणे षड्‌रसांबरोबर आहार्य द्रव्यांचे गुणकर्म आदि विस्तृत प्रमाणात वर्णन केलेले आहे. त्याप्रमाणे पाकशाला ह्यात काम करणारे कर्मचारी ह्यांचे देखिल वर्णन केलेले आहे. अन्नाला 'प्राण' म्हंटले आहे आणि जलाला 'जीवन' असे म्हंटले आहे. शुध्द जल सेवनावर विशेष भर दिल्या गेला आहे. जलपात्र ताम्र धातुचे असावे किंवा मृत्तिकेचे असावे. शुध्द जलाकरिता गंगाजल त्याकाळी योग्य समजल्या जाई. ह्याकरिता राज दरबारी एक स्वतंत्र विभाग होता. शुध्दजल ताम्र जल पात्रात भरुन ते मोहोरबंद केल्या जात असे. जल शुध्दी करण्याच्या विधी उदा.प्रसादन, शीतकरण, आणि अधिवासन ह्यांचा उल्लेख प्राचिन ग्रंथात मिळतो. तसेच जल विषाक्त झाल्यास त्याचा शोधन विधी सुश्रुतात वर्णन केलेला आहे. तसेच भूमी, वायु, ह्यांच्या विधिंचे वर्णन देखिल मिळते. प्राचिन काळी विविध यज्ञांच्या माध्यमांतून हे कार्य केल्या जात असे. यज्ञा मधे गुग्गुळ, जटामांसी, आदि कृमीनाशक द्रव्यांचा उपयोग केल्या जात असे.

गोपथ ब्राम्हण मधे असे वर्णन आहे की ऋतुसंधि मधे व्याधिंचे प्रमाण अधिक असते. म्हणून त्या काळात जास्तीत जास्त यज्ञ केल्या जात असत. त्यामुळे विषाक्त वायुंची शुध्दी केल्या जात असे. असे असतांना देखिल त्या काळी विषमज्वर, गाठींचा ज्वर, शितला आदि व्याधिंचा फैलाव होत असे. आणि त्यामुळे जनपदोध्वंस होत असे. गावेच्या गावे ओसाड पडत. भूमि, वायु, जल आणि काल हे दुषित होत असा चरकात उल्लेख मिळतो. ह्याशिवाय दैवव्यपाश्रय उपचार, देव देवतांचे पूजन आदि उपाय केले जात. सामूहिक यज्ञ देखिल केल्या जात असत. त्यामुळे वायु मंडळातील किटाणूंचा नाश होऊन वायु शुध्दी केल्या जात असे. ह्याशिवाय वैयक्तिक सद्‌वृत्त आणि स्वस्थवृत्तांच्या नियमांचे पालन करण्यावर कटाक्षाने भर दिल्या जात असे.

सामाजिक स्वस्थ वृत्तांत सद्वत्ताचे महत्वाचे स्थान आहे. आयुर्वेदात तर ह्याचे वर्णन विपुल प्रमाणात मिळते. तसेच स्मृति आणि धर्मसुत्रात ह्याला धार्मिक रुप दिल्या गेल्यामुळे त्याचे पालन करणे आवश्यक वाटु लागले. अशाप्रकारे भारतीय सामाजिक स्वस्थवृत्तात आयुर्वेद आणि धर्मशास्त्र ह्या दोघांचाही सहयोग आहे. आणि म्हणून सद्वृत्ताचे स्वतः पालन करावे आणि त्याचप्रमाणे दुस-यांना त्याचा उपदेश हे एक धार्मिक कर्तव्य समजल्या जात असे आणि त्याचे परिपालन त्या काळातील जनता श्रध्दापूर्वक करित असे. त्यामुळे कुष्ठ, शीतला आदि व्याधिंना धार्मिकतेचे स्वरुप देऊन अशा औपसर्गिक व्याधि पासून पृथ्थकरण केल्या जात असे.

कुष्ठ, उन्माद आदि व्याधिंपासून पिडीत व्यक्तींच्या प्रति जो कोणी घृणा आदि निंदनीय प्रकार करेल त्याला दंड करण्याचा नियम त्या काळी होता ( कौ. अर्थशास्त्र 3,8,4 ) तसेच मलमुत्रांची विल्हेवाट सावधानीपूर्वक चांगल्या प्रकारे केल्या जात असे. ह्या कार्यात देखिल निष्काळजीपणा केल्यास त्याला दंडित केल्या जात असे. (कौ. अर्थशास्त्र 2,36,17,3,19).

ग्रामयोजना, नगरयोजना, जलनिकासव्यवस्था ह्यावर प्राचिनकाळी सुक्ष्मविचार केला होता. ह्यावरुन हे स्पष्ट होते की पाच हजार वर्षापूर्वी नगरयोजना पर्याप्त स्थितीत सुधारित होती. वास्तु शास्त्र ग्रंथामधे निवास योग्य भवन आरोग्य दृष्टया कसे असावे. ह्याचे देखिल वर्णन मिळते तसेच खेड्यापाड्यात कोणत्या ठिकाणी कोणत्या वर्णाच्या आणि वृत्तिच्या लोकांनी रहावे अश्याप्रकारे सर्व सामाजिक हितांच्या गोष्टींचा विचार केला गेला आहे.

ह्याप्रमाणे आदि मानवकाल, वैदिक काल आणि पौराणिक कालीन ग्रंथात आयुर्वेद शास्त्राचा उल्लेख मिळतो. संहिताकालीन ह्या उदात्त् विचारावर मध्य युगात परकीय आक्रमणामुळे पडदा पडला. लोकांना वेदोक्त मूळ विचार न समजल्यामुळे पुन्हा अंधानुकरणाचे आगमन झाले. अठराव्या शतकात पाश्चिमात्य देशात वैज्ञानिक क्रांती झाली. नवनवीन यंत्रसामुग्री आणि आचार सरणींची रेलचेल झाली आणि त्याचा परिणाम भारतीय मानवावर झाला. रोग आणि रोगी ह्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण पार बदलला. पण अर्वाचिन विचार सरणीच्या अनुयायींना देखिल पुन्हा आयुर्वेदाकडे आज पहावे लागले.

प्रचलित काळात वैज्ञानिक आटोमिक न्युक्लियर युगात अत्याधुनिक सुख-समृध्दी आणि सुविधा संपन्न असुन देखिल विविध व्याधिंच्या बरोबरच मानसिक असंतुलनामुळे

ब-याच व्यक्ति आज अस्थीर आणि असमाधानी जीवन जगत आहेत. आधुनिक पध्दतीनुसार राहणीमान असणारे आजच्या समाजातील 60/70 % व्यक्ति उच्चरक्त दाब, मधुमेह, मानसिक तणाव आदि व्याधिंपासुन पिडीत आहेत. ही सत्यपरिस्थिती आहे, म्हणून श्रुति आणि स्मृतीच्या उपदेशांचे जे वैयक्तिकआणि सामाजिक स्वास्थ्य हेतु प्रत्येक व्यक्तिने शास्त्रोक्त रित्या परिपालन केल्यास मानव व्यधिग्रस्त होऊ शकत नाही.